महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १५७ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१३३६ : दक्षिणेमध्ये विजयनगर हिंदू राज्याची स्थापना झाली.

१८५९ : क्रांतिवीर तात्या टोपे यांचा स्मृतिदिन.

१८९८ : रँडसाहेबाचा वध केल्यामुळे दामोदर हरि चापेकर यांना फाशी.

१९५५ : जगप्रसिध्द शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाईन यांचे निधन.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७८,४९३.५४ | +५०४.८६ (०.६५%) |
| डॉलर | ₹ ९२.६५ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४१ | २५ |
| दिल्ली | ३८ | २४ |
| मुंबई | ३५ | २६ |
| नागपूर | ४२ | २६ |
| पुणे | ३९ | २० |

**सुविचार**

आपल्या आयुष्याच्या प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधा. निसर्गात, माणसांमध्ये, आणि दैनंदिन गोष्टींमध्ये सुद्धा सौंदर्य आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:०७ संध्या-६:४८

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५५,९८५/- २,६५,०००/-

# महिला आरक्षण घटनादुरुस्ती नामंजूर

## विशेष अधिवेशनात २१ तास चर्चा होऊनही विधेयक फेटाळले

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर झालं आहे. या विधेयकासाठी दोन तृतीयांश मतदान गरजेचं होतं. पण ते मिळवण्यात सरकारला अपयश आलं. हा मोदी ३.० सरकारसाठी पहिला मोठा धक्का मानला जात आहे.**

मोदी सरकारसाठी महत्त्वाच्या असलेल्या महिला आरक्षण विधेयकावर लोकसभेत मतदान झालं आहे. लोकसभेच्या २९८ खासदारांनी विधेयकाच्या बाजूनं मतदान केलं. तर २३० खासदारांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. त्यामुळे हे विधेयक लोकसभेत नामंजूर झालं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दलची घोषणा केली.

विधेयकावरील मतदानानंतर सदनात मोठा गोंधळ झाला. आम्ही महिलांच्या हक्कांसाठी लढा देत राहू, संघर्ष करत राहू, असं केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी जोरजोरात म्हटलं. तेव्हा विरोधकांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे वातावरण तापलं. यावेळी पंतप्रधान मोदी लोकसभेत हजर होते. लोकसभेत विधेयक मंजूर करण्यात सरकारला अपयश आलं आहे. मोदी सरकार ३.० साठी हा मोठा धक्का मानला जात आहे. महिलांना आरक्षण देणारं विधेयक सरकारकडून आज लोकसभेत मांडण्यात (पान २ वर)



**लोकसभेच्या जागा ८५० पर्यंत वाढल्या असत्या**

सप्टेंबर २०२३ मध्ये, केंद्र सरकारने 'नारी शक्ती वंदन कायदा' मंजूर केला, जो महिला आरक्षण कायदा म्हणूनही ओळखला जातो. हा कायदा अंमलात आला असता तर या कायद्यानुसार, २०२९ पर्यंत लोकसभेच्या जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याची तरतूद या विधेयकात होती. त्यामुळे प्रत्येक राज्यात लोकसभेच्या जागा वाढल्या असत्या.

# गौतम अदानी आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती

## उद्योगपती मुकेश अंबानींना टाकले मागे

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**भारतीय उद्योगपती गौतम अदानी यांनी व्यावसायिक दिग्गज मुकेश अंबानी यांना मागे टाकत आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होण्याचा मान पुन्हा एकदा मिळवला आहे. बंदरे ते ऊर्जा अशा विविधांगी क्षेत्रांत विस्तारलेल्या अदानी समूहाच्या शेअर्समध्ये सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे त्यांच्या एकूण संपत्तीत मोठी भर पडली आहे.**

ताज्या ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकानुसार, गौतम अदानी यांची एकूण संपत्ती ९२.६ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. दुसरीकडे, मुकेश अंबानी यांची संपत्ती ९०.८ अब्ज डॉलर्स इतकी असून, अदानी आता भारत आणि आशिया खंडातील अव्वल श्रीमंत ठरले आहेत. जागतिक स्तरावर अदानी सध्या १९ व्या क्रमांकावर आहेत.

विशेष म्हणजे, जगातील पहिल्या ५० श्रीमंतांच्या यादीत स्थान मिळवणारे अदानी आणि अंबानी हे एकमेव भारतीय आहेत. अदानी समूहाच्या यशाचे मुख्य गमक त्यांच्या वैविध्यपूर्ण व्यवसायात आहे. भारतातील सर्वात मोठे खाजगी बंदर नेटवर्क, नवीकरणीय ऊर्जा उत्पादन आणि खाजगी विमानतळ चालवणारा हा देशातील सर्वात मोठा समूह आहे.

**थोडक्यात**

### वाहतूक पोलिसालाच मागितली खंडणी

**पिंपरी ।** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दंड भरतानाचे चित्रीकरण करून ते व्हायरल करण्याची धमकी देत एका पोलीस कर्मचाऱ्याकडे ५० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. ही घटना बुधवारी (१५ एप्रिल) सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास भुजबळ चौक येथील वाकड वाहतूक शाखेमध्ये घडली. या प्रकरणात पोलीस कॉन्स्टेबलने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वरद मनोज चव्हाण (विद्युत कॉलनी, कन्नड, संभाजीनगर) याला अटक केली असून त्याच्या दोन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### १५ लाखांचा बक्षीस असलेल्या कमांडरसह ४ नक्षलवादी ठार

**गडचिरोली ।** झारखंडमधील चतरा आणि हजारीबाग जिल्ह्यांच्या सीमावर्ती बटुका परिसरात शुक्रवारी सुरक्षा दलांनी केलेल्या एका मोठ्या कारवाईत चार जहाल नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले. यामध्ये १५ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या नक्षल्यांचा सबझोनल कमांडर सहदेव महतो याचा समावेश असून, या कारवाईमुळे नक्षलवादी संघटनेला मोठा हादरा बसला आहे.

इस्रायल-लेबनॉनमध्ये १० दिवसांची शस्त्रसंधी; ३४ वर्षांत प्रथमच दोन देशात चर्चा

# ट्रम्प यांच्याकडून युद्धविरामाची घोषणा!

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**मध्यपूर्वेतील इराण युद्धानंतर आता लेबनॉनसाठी एक दिलासादायक बातमी आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले आहे की, इस्रायल आणि लेबनॉन १० दिवसांच्या युद्धविरामावर सहमत झाले आहेत.**



**मी नऊ युद्धे मिटवली आता हे दहावे**

आपल्या नेहमीच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत, ट्रम्प यांनी याचे श्रेय घेत, जगभरातील नऊ युद्धे मिटवणे हा माझा सन्मान आहे, आणि हे माझे दहावे युद्ध असेल जे मी मिटवणार आहे. असे म्हटले.

इराण-अमेरिका युद्ध थांबल्यानंतरही, इस्रायल गेल्या काही आठवड्यांपासून लेबनॉनवर सातत्याने हल्ले करत होता. अध्यक्ष ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर माहिती दिली. याविषयी स्पष्ट करताना, या कराराचा पाया वॉशिंग्टनमध्ये घातला गेला, जिथे इस्रायल आणि लेबनॉनचे प्रतिनिधी समोरासमोर भेटले. ३४ वर्षांत दोन्ही देशांमधील ही पहिलीच औपचारिक बैठक होती. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो हे देखील उपस्थित होते.

ट्रम्प यांनी लेबनॉनचे अध्यक्ष जोसेफ औन आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यासोबत (पान २ वर)

# अनेर धरणाचे पाणी मेच्या पहिल्या आठवड्यात नदीत सोडणार; १७ गावांना मिळणार दिलासा

## आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश; भूजलपातळी वाढणार

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अनेर धरणाचे पाणी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अनेर नदीत सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. आमदार प्रा. चंद्रकांत अण्णा सोनवणे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या मागणीला अखेर मंजुरी मिळाली असून चोपडा तालुक्यातील १७ गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने विहिरी, बोअरवेल आणि कुपनलिकांची पाणी पातळी झपाट्याने खालावत आहे. परिणामी शेतकऱ्यांसमोर पिकांना पाणी देण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी शेती कोरडी पडण्याची वेळ आली असून पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही गंभीर स्थिती लक्षात घेऊन आ. सोनवणे यांनी धुळे जिल्हाधिकारी तसेच पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देत अनेर धरणाचे पाणी नदीत सोडण्याची मागणी केली होती. अनेर धरणात सध्या सुमारे ५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून त्याचा योग्य वापर करून नदीकाठच्या गावांतील भूजल पातळी वाढवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले होते. अनेर नदीकाठावरील १७ गावांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता वाढत असून शेतकरी व ग्रामस्थ दोघेही अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सकारात्मक दखल घेत मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अनेर नदीत पाणी सोडण्याचे नियोजन केले आहे. या निर्णयामुळे विहिरी व बोअरवेलमधील पाणी पातळी वाढून शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येलाही काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, या निर्णयामुळे ऐन उन्हाळ्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत असून शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# राहुल गांधींविरोधात 'एफआयआर' नोंदवा!


वृत्तसंस्था । लखनऊ

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठानं एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. रायबरेलीतील पोलीस ठाण्यात राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. हे प्रकरण राहुल गांधी यांच्या ब्रिटिश नागरिकत्वाशी संबंधित आहे.**

**कोर्टाचे आदेश; मोदी-शहांनी दिलेल्या टॉप सीक्रेट फाईल्समुळे गोची?**

भाजप नेते विग्नेश शिशिर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात एक याचिका दाखल केली होती. राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचं नागरिकत्व असल्याचा आरोप त्यांनी केला होता. राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी शिशिर यांच्याकडून (पान २ वर)

# भोंदू खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळकेंचा अपघाती मृत्यू



**समृद्धी हायवेवर कार कंटेनरखाली घुसली**

**खरातच्या अटकेपासून तणावात**

**नाशिकमधील महिला अत्याचार प्रकरणातील मुख्य संशयित अशोक खरात याच्या शिवनिका ट्रस्टचे जितेंद्र शेळके उपाध्यक्ष राहिले आहेत. शेळकेंच्या लॉन्समध्येही खरातची भागिदारी होती. अशोक खरातला अटक झाल्यापासून जितेंद्र शेळके तणावात होते.**

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**स्वत:ला कॅप्टन तसेच राजकीय ज्योतिषी म्हणवून घेणारा भोंदू आणि महिला अत्याचार प्रकरणातील प्रमुख संशयित अशोक खरात याच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचे अपघाती निधन झाल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे.**

समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात शेळकेंना प्राण गमवावे लागले. अपघातात यांचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी आणि मुलगा गंभीर जखमी आहेत. जितेंद्र शेळके हे अशोक खरातचे निकटवर्तीय मानले जात. (पान २ वर)

# बस-कार अपघातात ६ प्रवाशांचा होरपळून मृत्यू



वृत्तसंस्था । यादगीर

**जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यात भीषण अपघात घडला असून खासगी ट्रॅव्हल्स बस आणि कारच्या धडकेत लागलेल्या आगीत सहा प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले सर्वजण एकाच कुटुंबातील असून ते देवदर्शनावरून परत येत होते.**

मिळालेल्या माहितीनुसार, बंगळुरूहून कलबुर्गीकडे जाणारी खासगी आराम बस आणि विरुद्ध दिशेने येणारी कार शांतगिरी क्रॉसजवळ एकमेकांवर आदळली. धडक इतकी भीषण होती की बसने तत्काळ पेट घेतला.

आग लागल्यानंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला आणि जीव वाचवण्यासाठी प्रवासी बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागले.

मात्र, या आगीत सहा प्रवासी अडकले आणि त्यांचा होरपळून मृत्यू झाला. इतर प्रवाशांनी कसाबसा जीव वाचवला असून काही जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. या प्रकरणी पृथ्वीक शंकर यांनी प्राथमिक तपासात कार ओव्हरटेक करताना अपघात घडल्याची माहिती दिली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# माणसाने झेपेल तितकंच बोलावं; जास्त बाता मारु नका

## शरद पवारांवरील टीकेनंतर रोहिणी खडसेंचा सदाभाऊ खोतांना टोला

प्रतिनिधी । जळगाव

**सदाभाऊ खोत यांच्याकडून पवार कुटुंबियांवर पुरोगामित्वाच्या मुद्द्यावरुन करण्यात आलेल्या टीकेवरुन राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) च्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही आता खोत यांना लक्ष्य केले आहे. माणसाने झेपेल तितकंच बोलायला हवं, जास्त बाता मारु नका, असा टोला लगावत त्यांनी सदाभाऊंच्या वक्तव्याचा जोरदार समाचार घेतला आहे.**



रोहिणी खडसे यांनी एक्स वरील त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले की, 'अहो सदाभाऊ, तुम्ही ज्या पवार कुटुंबावर टीका करत आहात, त्याच कुटुंबाचा भाग आदरणीय अजितदादा पण आहेत. तसेच ज्यांचा प्रचार तुम्ही करत आहात त्या सुनेत्रा वहिनीही त्याच कुटुंबातील आहेत. त्यामुळे टीका करताना वास्तव लक्षात घ्यायला हवं'. त्यांनी पुढे पवार कुटुंबाच्या सामाजिक आणि पुरोगामी परंपरेचा उल्लेख करत सदाभाऊंवर थेट निशाणा साधला आहे.'तुमचा आणि पुरोगामी विचारांचा संबंध आहे का'? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शरद पवार यांच्या कुटुंबाचा सामाजिक वारसा अधोरेखित करत त्यांच्या मातोश्री ब्रिटिश काळात पुणे लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या, तर वडील सत्यशोधक चळवळीत कार्यरत होते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. याशिवाय सामाजिक समतेबाबत पवार कुटुंबाच्या भूमिकेचा उल्लेख करत त्यांनी म्हटले की, जिथे काही लोक मुलगाच हवा असा आग्रह धरतात, तिथे शरद पवार यांनी मुलीच्या जन्माचे स्वागत केले. हे विचार तुमच्या आकलनाच्या पलिकडचे आहेत. शेवटी त्यांनी सदाभाऊंना इशारा देत म्हटले आहे की, फार बाता मारू नका. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले असून, आगामी काळात वाद आणखी पेटण्याची शक्यता आहे.

**शिक्षण प्रसारासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यातही पवार कुटुंबाने मोलाची साथ दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. बहुजनांच्या घराघरात शिक्षण पोहोचवण्याच्या कार्यात पवार कुटुंबाचा मोठा वाटा आहे, असेही त्या म्हणाल्या.**

## संपादकीय

### आश्वासन अन् वास्तव

संसदीय अधिवेशनात नारीशक्ती वंदन अधिनियमावर चर्चा सुरू आहे. ही केवळ एक कायदेशीर तरतूद नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी ठरत आहे. पण याबाबतचे आश्वासन आणि यामागचे वास्तवही लक्षात घ्यायला पाहिजे. संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद हा एक ऐतिहासिक निर्णय मानला जात असला, तरी त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया, सामाजिक परिणाम आणि राजकीय संदर्भ यांचे संतुलित विश्लेषण करणे अत्यावश्यक ठरते. या अधिवेशनात झालेल्या चर्चांनी स्पष्ट केले आहे की, हा कायदा जितका आशादायक आहे, तितकाच तो अनेक प्रश्न, आव्हाने निर्माण करणारादेखील आहे. महिलांच्या आरक्षणाची मागणी नवीन नाही. १९९० च्या दशकापासून हा मुद्दा सातत्याने पुढे येत राहिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्ती कायद्यांद्वारे महिलांना आरक्षण देण्यात आले आणि त्याचे काही सकारात्मक परिणामही दिसून आले. अनेक महिलांनी ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनात प्रभावी भूमिका बजावली, ज्यामुळे आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांवर अधिक लक्ष केंद्रित झाले. त्यामुळेच, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरही महिलांना समानसंधी मिळाव्यात, ही अपेक्षा अधिक बळकट झाली. या पार्श्वभूमीवर नारीशक्ती वंदन अधिनियम हा एक नैसर्गिक आणि अपेक्षित टप्पा वाटतो. या अधिनियमाचा सर्वात मोठा सकारात्मक पैलू म्हणजे महिलांच्या प्रतिनिधित्वात होणारी संभाव्य वाढ. सध्या संसद आणि विधानसभांमध्ये महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे, ज्यामुळे त्यांच्या प्रश्नांना धोरणनिर्मितीत पुरेसे स्थान मिळत नाही. ३३ टक्के आरक्षणामुळे महिलांचा आवाज अधिक प्रभावीपणे पुढे येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर समाजाच्या एकूण विकासासाठीही सकारात्मक परिणाम होऊ शकतो. महिलांच्या वाढत्या सहभागामुळे धोरणनिर्मिती अधिक समावेशक आणि संवेदनशील होण्याची शक्यता आहे. मात्र, या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित मुद्दे गंभीर चिंतेचे कारण ठरतात. हा कायदा त्वरित लागू होत नसून, तो जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडलेला आहे. त्यामुळे महिलांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी काही वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. हा विलंब केवळ तांत्रिक नसून, तो राजकीय इच्छाशक्तीच्या प्रश्नाशी जोडलेला आहे. आजच्या संसदीय चर्चेतही या मुद्द्यावर विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत की, महिलांच्या सशक्तीकरणाचा मुद्दा इतका तातडीचा असताना, त्याची अंमलबजावणी पुढे का ढकलली जात आहे. याशिवाय, या अधिनियमामुळे मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांचे पुनर्वाटप केल्यास काही राज्यांना अधिक प्रतिनिधित्व मिळू शकते, तर काही राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, हा मुद्दा केवळ महिला आरक्षणापुरता मर्यादित राहत नाही, तर तो संघराज्यीय संतुलनाशी संबंधित ठरतो. काही विरोधी पक्षांनी या अधिनियमाला महिला आरक्षणाच्या आडून राजकीय पुनर्रचना असे संबोधले आहे, जे या चर्चेतील एक महत्त्वाचे राजकीय परिमाण दर्शवते. अधिनियमाचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सशक्तीकरण या संकल्पनेचा अर्थ. केवळ प्रतिनिधित्व वाढवणे म्हणजे सशक्तीकरण आहे का? स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनुभव सांगतो की, अनेक ठिकाणी महिलांना आरक्षण मिळाले असले तरी, निर्णय प्रक्रियेत त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला. प्रॉक्सीराजकारण ही संकल्पना अजूनही अस्तित्वात आहे. त्यामुळे, संरचनात्मक पितृसत्ताकता बदलल्याशिवाय, केवळ आरक्षणाने महिलांचे खरे सशक्तीकरण साध्य होईल, असे म्हणणे कठीण आहे. या अधिनियमातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आंतरछेदी असमानताचा अभाव. परिणामी, आरक्षणाचा लाभ प्रामुख्याने शहरी आणि उच्चवर्गीय महिलांकडे झुकण्याची शक्यता आहे. त्यामुळे, सामाजिक न्यायाचा व्यापक उद्देश पूर्णपणे साध्य होईल का, हा प्रश्न निर्माण होतो.

## एकही मतदार वंचित राहणार नाही!

### जीपीएस मित्र परिवाराचा धडाकेबाज उपक्रम; मतदार मॅपिंग कॅम्पला विक्रमी प्रतिसाद

प्रतिनिधी । पाळधी

**मतदार हक्काकडे होणाऱ्या दुर्लक्षाला जोरदार चपराक देत एकही मतदार वंचित राहू नये, हा ठाम निर्धार कृतीत उतरवत जीपीएस मित्र परिवाराने राबवलेला मतदार मॅपिंग कॅम्प गावात अक्षरशः जनजागृतीची लाट निर्माण करणारा ठरला. पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली पार पडलेला हा उपक्रम केवळ औपचारिक कॅम्प न ठरता एक सशक्त लोकचळवळ म्हणून उभा राहिला.**



या कॅम्पमध्ये तब्बल २,५०० नागरिकांचे मतदार मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून, ही संख्या गावाच्या इतिहासात विक्रमी ठरत आहे. अनेक वर्षांपासून प्रक्रियेच्या अभावामुळे किंवा दुर्लक्षामुळे मतदान हक्कापासून दूर राहिलेल्या नागरिकांना या उपक्रमामुळे नवसंजीवनी मिळाली आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये एकही मतदार वंचित राहणार नाही, यासाठी हा कॅम्प निर्णायक पाऊल मानला जात आहे. विशेष म्हणजे, जीपीएस मित्र परिवाराने केवळ कागदोपत्री कामावर समाधान न मानता घराघरात जाऊन प्रत्यक्ष जनसंपर्क साधला. मागील दोन-तीन दिवस गावभर दवंडी देत, गल्लीबोळांत फिरून नागरिकांना जागरूक केले गेले. याशिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रभावी जनजागृती करण्यात आली. या मोहिमेत प्रतापराव पाटील स्वतः मैदानात उतरून नागरिकांशी थेट संवाद साधताना दिसले, ज्यामुळे उपक्रमाला अधिक बळ मिळाले. या संपूर्ण प्रक्रियेत बीएलओ, शिक्षक, उपशिक्षक तसेच इतर शासकीय कर्मचारी आणि बीएलए यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमामुळे केवळ मतदान प्रक्रिया सक्षम होणार नाही, तर नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी सुद्धा सुलभ झाली आहे. त्यामुळे गावात समाधानाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, जीपीएस मित्रपरिवाराच्या कार्याचे सर्व स्तरांतून जोरदार कौतुक होत आहे. प्रत्येक मतदार सुरक्षित प्रत्येक बूथ मजबूत हा नारा आता प्रत्यक्षात उतरवण्यात जीपीएस मित्र परिवार यशस्वी ठरला असून, भविष्यातही असेच लोकाभिमुख आणि परिणामकारक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## पं.सुधाकर तळणीकर यांना राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । पाचोरा



**महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल पाचोरा येथील सुरमणी पं. डॉ. सुधाकर यशवंत तळणीकर यांना राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र स्वर रत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.**

गेल्या ४३ वर्षांपासून भारतीय संगीत क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात येत आहे. त्यांच्या कार्यामुळे संगीत क्षेत्रात मोठी भर पडली असून, अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी जळगाव, बुलढाणा, मराठवाडा यासह राज्यातील अनेक जिल्ह्यात त्यांनी संगीतप्रेमी नविन पिढीला गायन आणि संगीत कलेचे शिक्षण दिले आहे. तळणीकर यांना आजवर अनेक राष्ट्रीय, राज्य पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दि. २६ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता निवारा वृद्धाश्रम हॉल, एस. एम. जोशी फाउंडेशन समोर, पत्रकार भवन शेजारी, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे येथे पार पडणार आहे.

या सोहळ्याचे आयोजन विजेता मीडिया, पुणे यांच्या वतीने करण्यात आले असून, उपस्थित राहून मान्यवरांचा गौरव सोहळा अनुभवण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## इंग्रजी नोटिसांचा गुंता सोडा, मराठीत संवाद साधा!

### नहीच्या अधिकाऱ्यांना मनसेचे निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून अतिक्रमण हटविण्याबाबत दिल्या जाणाऱ्या नोटिसा इंग्रजीऐवजी मराठी भाषेतून द्याव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली.**



यासंदर्भात प्रकल्प संचालकांना निवेदन देऊन स्थानिक नागरिकांच्या भावना कळवण्यात आल्या. जळगाव शहर आणि परिसरात महामार्गाच्या कामासाठी किंवा अतिक्रमण निर्मूलनासाठी मार्फत नागरिकांना नोटिसा बजावण्यात येतात. मात्र, या नोटिसा बहुतांश वेळा इंग्रजी किंवा हिंदी भाषेत असतात. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः अल्पशिक्षित व्यापाऱ्यांना प्रशासकीय भाषेतील तांत्रिक शब्द समजत नाहीत. परिणामी, नेमकी काय कारवाई होणार आहे किंवा आपली बाजू कशी मांडायची, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होते. या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून आशुतोष जाधव यांच्या पुढाकाराने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असताना आणि तसा शासन निर्णय असतानाही केंद्राच्या अखत्यारीतील कार्यालयांनी स्थानिकांशी मराठीत संवाद साधणे अपेक्षित आहे. मराठीत नोटिसा मिळाल्यास नागरिकांना कायदेशीर बाबी समजतील आणि विनाकारण होणारे वाद टाळता येतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी मनसेतर्फे अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र निकम, ललित शर्मा, खुशाल ठाकूर, पंकज चौधरी, राजेश मराठे, दीपक राठोड, राहुल चव्हाण यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला कर्मचाऱ्यांच्या सुविधांबाबत सकारात्मक चर्चा

### धुळे महापालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या बैठकीत विविध विषयांवर निर्णय

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत, कंत्राटी तसेच मानधन तत्वावरील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी, असुविधा व इतर समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता मनपा मुख्य सभागृह येथे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कामकाजादरम्यान येणाऱ्या विविध अडचणी व समस्यांबाबत मोकळेपणाने मते मांडली.**



कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध व्हाव्यात, यासाठी उपाययोजनांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी महिला कर्मचाऱ्यांसाठी प्रतीक्षा कक्ष उपलब्ध करून देण्याबाबत सूचना करण्यात आल्या. तसेच महिलांना त्यांच्या हक्कांविषयी व कायदेशीर बाबींविषयी अधिक माहिती मिळावी, यासाठी महिला संबंधित सेवा कायदे, तसेच वाढत्या सायबर फसवणूक प्रकारांपासून संरक्षण कसे करावे, याबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याबाबत आयुक्त नितीन कापडणीस यांनी सांगितले. महिलांच्या सुरक्षित, सुसज्ज व अनुकूल कार्यपरिसर निर्मितीसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत प्रशासन स्तरावर सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली. महिला कर्मचाऱ्यांच्या सूचना व मते लक्षात घेऊन भविष्यात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे यावेळी नमूद करण्यात आले. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपआयुक्त स्वालिहा मालगावे यांची उपस्थिती होती. विविध विभागातील महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या बैठकीत झालेल्या चर्चेमुळे महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यास मदत झाली असून कार्यस्थळी अधिक सुसंवाद व सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला. धुळे महापालिका महिला कर्मचाऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी व सुरक्षित कार्यपरिसर निर्मितीसाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## अमळनेरमध्ये गुडघा-खांदा आजारांवर तज्ज्ञ उपचारांची सुविधा

### येत्या मंगळवारी अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.पियुष वसईकरांच्या शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर तालुक्यातील रुग्णांसाठी आता मोठा दिलासा मिळाला असून गुडघा, खांदा,मणका तसेच हाडांच्या विविध आजारांवर व संधिवातावर तज्ज्ञ उपचारांची सुविधा अमळनेर येथे उपलब्ध झाली असून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पियुष सुरेश वसईकर यांची सेवा दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी उपलब्ध राहणार आहे.**

येत्या मंगळवारी दि.२१ एप्रिल २०२६ रोजी डॉ. वसईकर अमळनेर मध्ये उपलब्ध आहेत. आर्थोस्कोपी व कृत्रिम सांधेरोपण (जॉईंट रिप्लेसमेंट) क्षेत्रातील विशेष प्राविण्य असलेले डॉ. वसईकर हे गुडघ्यातील सतत वेदना, चालताना त्रास, जिना चढताना अडचण, सांधे लॉक होणे, खांद्याची हालचाल करताना वेदना तसेच संधिवात यांसारख्या आजारांवर तपासणी व अत्याधुनिक उपचार करणार आहेत.

रुग्णांकरिता ही सुविधा धन्वंतरी हॉस्पिटल तसेच दीपक मेडिकल, धुळे रोड, अमळनेर येथे उपलब्ध असून दिवसभर रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.

रुग्णांनी पूर्वनोंदणी करून यावे. पूर्व नोंदणीसाठी धन्वंतरी मेडिकल (सकाळी १० ते १२ वेळेत) दीपक मेडिकल येथे (सकाळी ११ ते १ वेळेत) असून सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी येणाऱ्या रुग्णांसाठी केले आहे.

## डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त अभाविपतर्फे शीतपेय वाटप

प्रतिनिधी । जळगाव

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जळगाव शाखेच्यावतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन व अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या सामाजिक समता, न्याय, बंधुता आणि शिक्षणाच्या संदेशाचे स्मरण करण्यात आले. यावर्षीही शोभायात्रेत सहभागी झालेल्या नागरिकांना थंड पेयांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत सुमारे २५०० पेक्षा अधिक लोकांना शीतपेय वाटप करण्यात आले.

## जैन इरिगेशनमध्ये अग्निशमन सेवा सप्ताह साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**जैन इरिगेशन सिस्टीम्स व जैन फार्मफ्रेश फूड यासह आस्थापनांमध्ये अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात आला. अग्निशमन यंत्रणा व उपकरणांचे पूजन करून सप्ताहाची सुरवात झाली.**




दि.१४ ते २० एप्रिलदरम्यान अग्निशमन सेवा सप्ताहाची मुख्य संकल्पना सुरक्षित विद्यालय, सुरक्षित रुग्णालय आणि अग्नि सुरक्षेबाबत जागरूक समाजः आग प्रतिबंधासाठी एकत्र ही आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शाळा आणि रुग्णालयांसारख्या संवेदनशील ठिकाणांना सुरक्षित करणे आणि आगीच्या घटना रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. आग प्रतिबंध ही केवळ अग्निशमन दलाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही भावना रुजवण्यासाठी सहकाऱ्यांना प्रतिज्ञा देण्यात आली. जैन फूड पार्क, जैन हिल्स, जैन व्हॅली, जैन एनर्जी पार्क येथे जैन व्हेली येथे १४ एप्रिल अग्निशमन सेवा दिवसानिमित्त अग्निशमन शहिदांना आदरांजली वाहिली. वरिष्ठ सहकारी सुनील गुप्ता, व्ही. पी. पाटील, रोशन शहा, संजय पारस, जी. आर. पाटील, वाय. जे. पाटील, तुकाराम बुधवंत व फायर सेफ्टी विभागात सहकारी उपस्थित होते. तर प्लास्टिक पार्क येथे सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ सहकारी जे.एस.जैन, सी. एस. नाईक यांच्या उपस्थित झालेल्या अग्निशमन यंत्रणा पूजनाप्रसंगी डॉ.जनमेजय नेमाडे, डॉ. योगेश बाफना, शुभम शुक्ला, अभिजीत पवार व फायरमन उपस्थित होते.

## पान १ वरुन

### ट्रम्प यांच्याकडून युध्दविरामाची......

झालेल्या आपल्या चर्चेचे वर्णन विलक्षण असे केले. त्यांनी याविषयी माहिती देताना, हा १० दिवसांचा शस्त्रसंधी केवळ एक सुरुवात असून, या प्रदेशात चिरस्थायी शांतता प्रस्थापित करणे हे अंतिम ध्येय आहे. असे म्हटले आहे.

### भोंदू खरातच्या शिवनिका ......

समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगर येथून शिर्डीकडे जात असताना धोत्रे गावाजवळ हा अपघात झाला. उभ्या कंटेनरला कारने पाठीमागून धडक दिल्यानंतरकार थेट कंटेनरखाली घुसली. अपघातावेळी गाडी कोण चालवत होतं, हे नेमकं स्पष्ट झालेलं नाही. पत्नी, मुलगा गंभीर जखमी - अपघातात जितेंद्र शेळके यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांची पत्नी आणि मुलगा हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमी मुलाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, तर अपघातानंतर बराच काळ पत्नी गाडीत अडकलेली होती.

### राहुल गांधींविरोधात......

करण्यात आली होती. त्यावर न्यायालयात सुनावणी झाली. राहुल गांधींवर नेमके आरोप काय? - राहुल गांधी यांच्याकडे दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप आहे. म्हणजेच ते एकीकडे भारताचे नागरिक आहेत.

### महिला आरक्षण घटनादुरुस्ती......

आलं. विधेयकाच्या मंजुरीसाठी दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा गरजेचा होता. पण तो मिळवण्यात सरकारला अपयश आलं. लोकसभेचं संख्याबळ ५४० इतकं आहे. विधेयकाच्या मंजुरीसाठी ३६० खासदारांचा पाठिंबा आवश्यक होता. पण या विधेयकाच्या बाजूनं केवळ २९८ खासदारांनी मतदान केलं. विधेयकाच्या मंजुरीसाठी ६२ मतं कमी पडली. एकूण २३० खासदारांनी विरोधात मतदान केलं. महिला आरक्षण विधेयक नामंजूर होताच सरकारनं या संदर्भातील आणखी २ विधेयकं मागे घेतली. त्यामुळे महिला आरक्षणाशी संबंधित तिन्ही विधेयकांच्या संदर्भात सरकारला धक्का बसला आहे. मतदान संपताच भाजप आणि एनडीएमधील पक्षांच्या महिला खासदारांनी विरोधकांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरु केली.

## जळगावात ७५ मुला-मुलींचा एकच ध्यास, १२ तास अभ्यास

### सूर्याजीवनी बहुउद्देशीय संस्थेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सूर्याजीवनी बहुउद्देशीय संस्था व झाल्टे प्रतिष्ठान यांचे विद्यमाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. दि. १३ एप्रिल रोजी सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत एकच ध्यास, बारा तास अभ्यास या अभिनव उपक्रमात ७५ मुलामुलींनी सहभाग घेतला. १२ तास स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन केले.**



प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्याहस्ते माल्यार्पण करण्यात आले. दि.१४ एप्रिल रोजी स्पर्धा परीक्षेवर आधारित नाविन्यपूर्ण प्रश्न मंजुषा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात १०० मुलामुलींनी सहभाग घेतला. बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी विचार मंचावर सूर्यजीवनीचे अध्यक्ष सुनील जाधव, डीवायएसपी नितीन गणापुरे, सूर्यजीवनीचे सचिव हरिश्चंद्र सोनवणे तसेच सदस्य मिलिंद सपकाळे, सुकदेव तायडे, आयुष्यमती जाधव आदी उपस्थित होते. नितीन गणापुरे यांनी स्पर्धा परिक्षार्थी मुलामुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. नितीन गणापुरे यांना सुर्याजीवनी संस्थेतर्फे भारताचे संविधान हे पुस्तक भेट देण्यात आले. प्रश्न मंजुषा स्पर्धेत विजेत्यांना डीवायएसपी नितीन गणापुरे यांच्या हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन हरिश्चंद्र सोनवणे यांनी केले. आभार सुखदेव तायडे यांनी मानले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# उन्हाळ्यात पाणी-वीजपुरवठा अखंडितपणे सुरु ठेवा

## आढावा बैठकीत पालकमंत्र्यांचे निर्देश; जिल्ह्यात एकही टँकर सुरु नाही; केवळ १४ विहिरी अधिग्रहित

प्रतिनिधी । जळगाव

**पाणीपुरवठा व वीज ही मुलभूत व अत्यावश्यक सेवा असून, उन्हाळ्याच्या काळात कोणत्याही परिस्थितीत पाणी व वीजपुरवठा खंडित होऊ नये. यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना अखंडितपणे सेवा द्यावी, असे निर्देश राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.**




पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात जिल्ह्यातील पाणीटंचाई व महावितरण कडील विविध विषयांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार चंद्रकांत सोनवणे, आमदार अनिल पाटील, आमदार अमोल जावळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, उपमहापौर मनोज चौधरी तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शहरात व ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजनांच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महावितरणने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले. अत्यावश्यक परिस्थितीत पाणी व वीज खंडित करावी लागल्यास जिल्हाधिकारी यांना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असलेल्या भागांमध्ये वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जलजीवन मिशनअंतर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे अधिकारींनी त्याठिकाणी जाऊन त्याचे तात्काळ निराकरण करावे, महावितरणकडील वीज जोडणीअभावी काही पाणीपुरवठा योजना रखडल्या असल्याचे निदर्शनास आणून देत त्या तातडीने सुरू करण्याचे निर्देश देऊन अनधिकृत पाणी उपसा होत असल्यास अशा ठिकाणी पाणी मोटर कनेक्शन तात्काळ बंद करावे, असे निर्देशित पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. नगरपालिका व नगरपंचायत स्तरावरील विकासकामांमध्ये दर्जा राखण्यावर भर देत अत्यल्प दरात कामे घेतल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे नमूद करून संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याचे आवाहन करण्यात केले. जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनांची अपुर्ण कामे तात्काळ पुर्ण करण्याच्या सूचना ही पालकमंत्र्यांनी दिल्या. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे म्हणाले, भुसावळ औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना वीज पुरवठा संदर्भात अडचणी आहेत विजेच्या अडचणीमुळे त्यांच्या उत्पादनावर परिणाम होत असून या संदर्भात महावितरणने या भागातील विजेचा प्रश्न तात्काळ सोडवावा अशा सूचना त्यांनी दिल्यात. बैठकीत आमदार अनिल पाटील, आमदार चंद्रकांत सोनवणे, अमोल जावळे व जिल्ह्यातील नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष यांनी आपल्या मतदारसंघातील प्रलंबित पाणीपुरवठा, वीज पुरवठा योजना संदर्भात सूचना मांडल्या. प्रास्ताविक जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी आभार मानले.

## थोडक्यात

### मधुरा डांगे यांच्या स्वसंवेद्य काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**जळगाव ।** येथील जुन्या जळगावातील रामपेठमधील रहिवासी उज्वला व स्वरराज छोटा गंधर्व पुरस्कार सन्मानित स्व. शरदचंद्र धर्माधिकारी यांची नात मधुरा गजानन डांगे यांच्या स्वसंवेद्य या दुसऱ्या काव्यसंग्रहाचा ला.ना. हायस्कूलच्या गंधे सभागृहात प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मध्यप्रदेशातील नर्मदालय, लेपा येथील पू. विशुद्धानंदा भारती यांच्या हस्ते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या धर्म जागरण विभागाचे अखिल भारतीय प्रमुख शरदराव ढोले, पू. नृसिंह विजयेंद्र सरस्वती व श्रीराम मंदिर संस्थांनचे ह.भ.प. मंगेश महाराज जोशी यांच्या प्रमुख उपस्थिती प्रकाशन होणार आहे. मधुरा यांच्या सृजनांकित या पहिल्या काव्यसंग्रहाचे पुणे येथे अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते प्रकाशन झाले आहे.

### शनिपेठचे पोलीस नाईक बडतर्फ, तर पोलीस निरीक्षकांची बदली

**जळगाव ।** जळगाव शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या घटना आणि भ्रष्टाचाराचे प्रकरण समोर आल्यानंतर, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी शनिपेठ पोलीस ठाण्याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. लाच स्वीकारताना रंगेहात पकडल्या गेलेल्या पोलीस नाईक विनोद अहिरे याला थेट सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून, पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर यांची तातडीने नियंत्रण कक्षात रवानगी करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन गटांतील हाणामारीच्या घटनांमुळे तणावाचे वातावरण होते.त्यातच पोलीस नाईक विनोद अहिरे लाचप्रकरण चव्हाट्यावर आले.

# विचारवाहकच चळवळीपासून दूर गेल्याने चळवळीची झाली वाताहत : डॉ.मिलिंद बागुल



प्रतिनिधी । जळगाव

भारतीय समाज व्यवस्थेचा पाया हा अनेक रूढी, परंपरांवर अनिष्ट अशा गोष्टींवर उभा असताना ज्या परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ज्ञानाच्या बळावर भारतीय सामाजिक स्थितीला बदलवून टाकलं अशा परिस्थितीला पुढे नेण्यासाठी सामाजिक चळवळीची गती प्रगल्भ करण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरच्या पहिल्या पिढीने जे अहोरात्र परिश्रम घेतले. त्याग, समर्पण आणि बलिदानाची तयारी ठेवून चळवळ उभारली. त्यामुळे पुढच्या पिढ्यांना जी आपली सांसरीक घडी बसवता आली. चांगल्या प्रकारच्या जीवन जगण्याची हमी मिळाली. शिक्षणातून प्रगती साधली आणि त्यानंतर चळवळीशी फारकत घेत आपल्या स्वतःचं अस्तित्व टिकवण्यात मशकुल झालेल्या पिढीने दलित चळवळीची वाताहत केलेली दिसून येते, असे मत साहित्यिक डॉ. मिलिंद बागुल यांनी केले. मैत्री संघटन शांतीनगर परिसर भुसावळ यांनी आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. या कार्यक्रमास नगरसेवक युवराज लोणारी, मैत्री संघटनेचे अध्यक्ष प्रेरणा नरवाडे, नगरसेविका सीमा नरवाडे उपस्थित होत्या. प्रास्ताविक डॉ. जे.व्ही. धनवीज, परिचय धम्मचारी आर्य सागर, मनीष गुरचळ यांनी तर सूत्रसंचालन धम्मचारी आदित्य कीर्ती एन. एस.गुरचल यांनी केले. आभार भीमराव सरदार यांनी मानले. त्रिशरण, पंचशील, वंदना मालती धनवीज, वैशाली उमरे, सोनाली जगदेव यांनी सादर केले. तर भीम गीताचे गायन विवेक नरवाडे यांनी केले.

# भगवान परशूराम पालखी उत्सवातून घराघरात पोहचणार

## उत्सवाची तयारी पूर्णत्वाकडे; आज पालखी उत्सव : प्रसाद पटवे यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**ब्रह्मश्री बहुउद्देशीय संस्था सर्व शाखिय ब्राह्मण समाज जळगावतर्फे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही भगवान श्री परशुराम पालखी उत्सव उत्साहात साजरा होत आहे. दि. १८ व दि. १९ रोजी हा सोहळा होणार आहे. भगवान परशूरामाची पालखी काढण्यात येणार असून या निमित्ताने तयारी अंतिम टप्प्यात आली असून घराघरात भगवान परशूराम पोहचण्याचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवून उत्सवाची तयारी केली असल्याचे अध्यक्ष प्रसाद पटवे यांनी सांगितले.**

भगवान परशुराम पालखी मिरवणूक ही आपल्या भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाची आणि भावनिक परंपरा आहे. ही मिरवणूक केवळ धार्मिक विधी नसून, ती भक्ती, परंपरा आणि समाजातील ऐक्याचे जिवंत प्रतीक आहे. या सोहळ्यात देव मंदिरातून बाहेर पडून नगरप्रदक्षिणा करतात. यामागील भाव असा की, देव स्वतः आपल्या भक्तांना भेटण्यासाठी त्यांच्या दारी येतात, त्यांना आशीर्वाद देतात आणि संपूर्ण गावात सकारात्मक ऊर्जा व चैतन्य निर्माण करतात. त्यामुळे हा सोहळा भक्तांसाठी एक अत्यंत आनंददायी आणि श्रद्धेचा अनुभव ठरतो. पालखी मिरवणुकीमागील एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे सर्व भक्तांना देवदर्शनाची संधी मिळावी हा आहे. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि भजन-कीर्तन यांच्या सुरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. हा सोहळा एक सामुदायिक उत्सव बनतो, ज्यात सर्वजण एकत्र येऊन आनंद साजरा करतात. वारकरी संप्रदायातील आळंदी ते पंढरपूर आणि देहू ते पंढरपूर या पालखी परंपरा शतकानुशतके चालत आल्या आहेत. या परंपरा संत आणि भक्त यांच्यातील नात्याची साक्ष देतात आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करतात. काही ठिकाणी, विशेषतः शिमगा किंवा होळीच्या सणात, पालखी मिरवणूक ही चांगल्या शक्तींचा वाईट शक्तींवर विजय दर्शवणारे प्रतीक म्हणूनही साजरी केली जाते. थोडक्यात, पालखी म्हणजे देवाचे लोकांमध्ये प्रस्थान होय. हा सोहळा भक्ती, आनंद, एकात्मता आणि संस्कृतीचा संगम घडवणारा एक अद्वितीय अनुभव आहे. ब्राह्मण समाजाचे प्रेरणास्थान भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव व पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे साजरा करत आहोत. शनिवार दि.१८ रोजी सायंकाळी ५ वाजता हनुमान मंदिर येथून पालखी सोहळ्याचे आयोजन केले आहे. यावेळी टाळ-मृदुंग, लेझीम पथकासह शोभयात्रा श्री सप्तशृंगी देवी मंदिर, प्रेमनगर येथे सांगता होईल. दि.१९ रोजी श्रीसप्तशृंगी देवी मंदिर येथे सकाळी ७ वाजता भगवान परशुरामाच्या मुर्तीला अभिषेक, आरती व पुजन केले जाईल व सायंकाळी श्रीभगवान परशुराम शोभायात्रेच्या मिरवणुकीत पालखी सामील होईल. आपल्या सहभागातून ब्राह्मण एकता वाढवूया, असे आवाहन अध्यक्ष प्रसाद पटवे व समस्त ब्रह्मश्री परिवार यांनी केले आहे.

# जळगावच्या तरुणाची राष्ट्रीयस्तरावर मोठी झेप

## श्रीराज पाटील यांचा खडू शिल्पाची ओएमजी बुक ऑफ रेकॉर्ड



प्रतिनिधी । जळगाव

**येथील जिद्द, चिकाटी आणि कलेप्रती असलेली अफाट ओढ यांच्या जोरावर जळगावच्या श्रीराज किशोरकुमार पाटील याने यशाचे उत्तुंग शिखर गाठले आहे. श्रीराजने साकारलेल्या अद्वितीय खडू शिल्पाची दखल आता राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून, त्याची ओ.एम.जी. नॅशनल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारीरोहन घुगे यांनी श्रीराजचा गौरव केला.**

खडूवर अतिशय सूक्ष्म आणि कलात्मक कोरीव काम करून श्रीराजने हे शिल्प साकारले आहे. त्याच्या या असामान्य कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या यशात त्याला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार आणि गिनीज बुक रेकॉर्ड होल्डर सुनिल दाभाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुरु-शिष्यांच्या या जोडीने जळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.या सोहळ्याप्रसंगी वनश्री पाटील, किशोरकुमार पाटील व बहिण सौम्या पाटील आणि त्याचे मार्गदर्शक सुनिल दाभाडे उपस्थित होते.

# सहा संघाचे प्रशिक्षक, खेळाडूंसह संघ मालकांनी जल्लोषमय वातावरणात काढली भव्य रॅली!

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने व रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स प्रायोजीत व अलरीक इलेक्ट्रीकल्स सहप्रायोजकत्वाखाली आयोजित जळगाव क्रिकेट लिग-२०२६, -२० क्रिकेटचा महा-थरार सहा संघांमध्ये दि.१८ ते २६ एप्रिल दरम्यान कांताईनगर जैन ड्रिम स्पेसेस मेहरूण तलावाजवळ येथे रंगणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरात भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये सहा संघ मालक, प्रशिक्षक, खेळाडूंनी सहभाग घेतला.**




काव्यवरत्नाली चौक येथून निघालेल्या रॅलीला हिरवी झेंडी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष एस. टी. खैरनार, दाल परिवारचे अतुल कोगटा, एस.के. ट्रान्सलाईनचे प्रणव कोठारी, सातपुडा आटोमोबाईलचे किरण बच्छाव, सुहांस केमिकल्सचे संदीप काबरा, एम. व्ही. जे. इंटस्ट्रीयल कन्सलन्टशी सीए महावीर जैन, विमल जैन, खलिल बनवट, सागर पार्क क्लबचे सर्व सहकारी, अनिल कांकरिया, जिल्हा क्रिकेट असोशिऐशनचे सचिव अरविंद देशपांडे, खजिनदार राजेंद्र लड्ढा, ॲड. सुरज जहाँगिर उपस्थित होते. खेळाडू, प्रशिक्षक व संघ मालक यांनी मोटर सायकल रॅली सहभाग घेतला.

ही रॅली काव्यरत्नावली चौक येथून निघून कलेक्टर बंगला मार्ग, मू. जे. महाविद्यालय, प्रभात चौक, स्वातंत्र चौक, पांडे डेअरी चौक, बेंडाळे चौक, चित्रा चौक मार्गे पुन्हा काव्यरत्नावली चौक येथे पोहचली. याठिकाणी संघ मालक व मान्यवरांच्या हस्ते जर्सीचे अनावरण केले. जळगाव कोगटा किंग, पाचोरा एसकेटी योद्धाज, जामनेर सातपुडा हिरोज, चाळिसगाव एसपीसीसी चॅलेन्र्स, अमळनेर सुहांस जायंटस, रावेर रॉयल्स संघाचे टि शर्ट (जर्सी) अनावरण करण्यात आले.

आता मौका जळगाव क्रिकेट लीगचा.. खेळाची ताकद दाखविण्याचा, जळगावची शान उंचाविण्याचा.. या टॅग लाईनच्या घोषणा उत्साहाने खेळाडूंनी दिल्यात. संघांचे फ्लॅग, प्रत्येक संघाचे टी शर्ट घालून सहभागी झालेले खेळाडूंनी जळगावकरांचे लक्ष वेधून घेतले. जळगाव क्रिकेट लिग-२०२६ या स्पर्धेमुळे शहरात क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून स्पर्धेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भव्य रॅली यशस्वीतेसाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्यांसह रविंद्र धर्माधिकारी, समिर गुळवे, हितेंद्र पटेल, प्रशांत विरकर, वरुण देशपांडे, जगदीश चावला, मोहम्मद फजल, उदय सोनवणे, युवाशक्तीचे विराज कावडिया यांच्यासह सहकारी यांनी सहकार्य केले.

# कॉर्पोरेट जिहादबाबत कठोर कारवाई करा !

## हिंदू जनजागृती समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

**कॉर्पोरेट जिहादबाबत कठोर कारवाई करा,अशा मागणीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्यावतीने जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.**



नाशिक येथील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये उघडकीस आलेला प्रकार हा केवळ महिला छेडछाडीचा गुन्हा नसून, तो अत्यंत खोलवर पसरलेल्या एका विखारी जिहादी मानसिकतेचा आणि संघटित गुन्हेगारीचा व्यापक भाग असल्याचे दिसून येत आहे. या कंपनीत काम करणाऱ्या हिंदू महिला कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारींनुसार, तिथे चार वर्षांपासून जाणीवपूर्वक हिंदू महिलांना लक्ष्य करणे, त्यांचा लैंगिक छळ करणे, बलात्कार करणे, धर्मांतरासाठी दबाव आणणे, गोमांस खाण्यास बाध्य करणे आणि नमाज पठणासारख्या धार्मिक कृतींसाठी सक्ती करणे असे धक्कादायक प्रकार घडले आहेत. संबंधित कंपनीत वरिष्ठ पदावर असलेल्या मुसलमान समुदायाच्या व्यक्तींनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून हिंदू महिला कर्मचाऱ्यांवर दबाव आणला. हिंदू महिलांनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कामावरून काढून टाकण्याची धमकी देणे किंवा त्यांच्यावर अधिक अत्याचार करणे, कंपनी व्यवस्थापनाने तक्रारीकडे दुर्लक्ष करणे, असे अनेक अक्षम्य प्रकार घडले आहेत. हे केवळ वैयक्तिक गुन्हे नसून, कार्यस्थळावर धार्मिक दहशत निर्माण करण्याचा हा संघटित गुन्हेगारी प्रयत्न आहे.

महाराष्ट्र ही साधूसंतांची भूमी आहे. अशा पवित्र भूमीत जर कॉर्पोरेटच्या नावाखाली हिंदू महिलांची अब्रू लुटली जात असेल, हिंदू महिलांचे शोषण होत असेल आणि धर्मांतराचे कारस्थान रचले जात असेल, तर हिंदू समाज शांत बसणार नाही. जर प्रशासनाने या नराधमांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या व्यवस्थेवर त्वरित कठोर कारवाई केली नाही, तर हिंदु जनजागृती समिती अन्य हिंदू संघटनांच्या सहकार्याने तीव्र जनआंदोलन छेडेल,असा इशारा हिंदु जनजागृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

नाशिकमधील या प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अनुभवी, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या विशेष तपास पथकाद्वारे याची अत्यंत सखोल आणि समयबद्ध चौकशी करण्यात यावी. मुख्य आरोपींसह, या गुन्ह्यात सामील असलेल्या किंवा आरोपींना पाठीशी घालणाऱ्या कंपनी व्यवस्थापनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कलमान्वये गुन्हे दाखल करून त्यांना त्वरित अटक करण्यात यावी. ज्या कंपनीत महिलांवरील अत्याचार किंवा धार्मिक सक्तीचे प्रकार घडले आहेत, अशा कंपनीचा व्यवसाय परवाना रद्द करून कंपनीला टाळे ठोकण्यात यावे; तसेच सदर कंपनीच्या राज्यातील अन्य सर्व शाखांचीही सखोल तपासणी करण्यात यावी. नियमानुसार कारवाई का झाली नाही, याची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी,अशी मागणी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# क्रीडा संकुल बनले दारुड्यांचा अड्डा

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील मारवड रस्त्यावरील शासकीय क्रीडा संकुल रात्रीच्या वेळी दारुड्यांचा अड्डा बनत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. मद्यधुंद अवस्थेत येणारे काही जण परिसरात दारूच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे रॅपर व इतर कचरा टाकून जात असल्याने सकाळी व्यायाम आणि सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंना स्वच्छता मोहीम राबवावी लागत आहे.**



शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडा संस्कृतीसाठी महत्त्वाचे असलेले हे संकुल काही असामाजिक तत्वांमुळे अस्वच्छ व असुरक्षित बनत असल्याने खेळाडू आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी मद्यपान करून बाटल्या फोडणे आणि कचरा टाकणे यामुळे परिसराची पवित्रता व सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यामुळे पहाटे येणाऱ्या खेळाडूंना सरावाआधी स्वच्छता करावी लागते, ही अत्यंत खेदजनक बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. सदर क्रीडा संकुल गावाबाहेर आणि निर्जन स्थळी असल्याने भविष्यात मद्यधुंद अवस्थेत वाद किंवा अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाने रात्रीच्या वेळी नियमित गस्त घालून कारवाई करावी, अशी मागणी खेळाडू आणि व्यायामपटूंनी केली आहे.

## थोडक्यात

### जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवारी

**जळगाव ।** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन येत्या सोमवार, २० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ऋषिकेश काळे यांनी दिली आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच त्यांना न्याय मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो. महिलांच्या तक्रारी, अडचणी यांचे निराकरण शासकीय यंत्रणेमार्फत करण्यासाठी तसेच मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी महिला लोकशाही दिन ही प्रभावी व्यवस्था म्हणून कार्यरत आहे. जिल्हा स्तरावर हा महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी नियमितपणे आयोजित केला जातो. त्यानुसार २० एप्रिल रोजी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ संबंधित महिलांनी घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आगीचे तांडव : ढेकूतांडा येथे सहा शेतकऱ्यांचा २२ बिघे मका, बाजरी, गहू, हरभरा जळून खाक

प्रतिनिधी । अमळनेर

**वाढत्या तापमानामुळे शहर व तालुक्यात विविध ठिकाणी आगीचे तांडव सुरूच असून बुधवारी दुपारी ढेकू तांडा येथे सुमारे २२ बिघे शेतात मोठी आग लागल्याने जवळपास ६ शेतकऱ्यांचा मका, बाजरी, गहू, हरबरा जळून खाक झाला आहे. सदर आगीत शेतकरी बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.**

बुधवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास ढेकू तांडा येथे शेतात आग लागली. यात जवळपास २२ बिघे शेतात ही आग पसरल्याने शेतातील मका, बाजरी, गहू, हरभरा, संपूर्ण जाळून खाक झाला. विशेष म्हणजे यावेळी हवेने रौद्ररूप धारण केल्याने बाजूला असलेल्या तांड्यापर्यंत आगीचे लोण पसरण्याची शक्यता निर्माण झाली होती. परंतु ग्रामस्थांनी धावून जात आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केल्याने आणि अमळनेर पालिकेचे अग्निशमन दल वेळेवर पोहोचून आग विझविल्याने आग आटोक्यात येऊन पुढील अनर्थ टळला. यामुळे ग्रामस्थांनी अग्निशमन दलाचे आभार मानले. अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्यासह कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, जफर पठाण, आकाश संदानशिव आदींनी परिश्रम घेतले.

शेतात लागलेल्या आगीत एकरुखी शिवारातील भीमसिंग पन्ना जाधव यांचा मका, हिम्मत पन्ना जाधव यांची बाजरी व ठिबक नळ्या आणि पाईप, दीपक बळवंत जाधव यांचा मका व पाईप आणि ठिबक, कादरखा मेवाती यांचा मका तसेच ठिबक नळ्या व पाईप, कदरखा मेवाती यांचा मका, ठिबक व पाईप, शकीलखा मेवाती यांच्या ठिबक नळ्या आणि पाईप आदी ६ शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सदर आगीचा पंचनामा तलाठी गुलाबसिंग पावरा व कृषी सहाय्यक राजेंद्र पाटील यांनी केला. यावेळी भाजपा भटके विमुक्त आघाडीचे जिल्हा सरचिटणीस किरण जाधव व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

अग्निशमन दिनाच्या दिवशीही देखील दुपारी २ वाजेच्या सुमारास वर्णेश्वर मंदिराजवळ झाडांना शॉर्टसर्किटने आग लागली. तसेच ग्रामीण भागात आर्डी येथील राहुल पाटील यांच्या शेतातही चाऱ्यास आग लागली. दोन्ही ठिकाणी अग्निशमन दल तात्काळ पोहोचल्याने अनर्थ टळला. कर्मचाऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. याकामी अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी, कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारुक शेख, जफर पठाण, आनंदा झिम्बल, आकाश संदानशिव, लखन कंखरे, वसीम पठाण आदींनी परिश्रम घेतले.

## पुनगाव येथे शॉर्टसर्किटमुळे मका जळून खाक

**पाचोरा –** प्रतिनिधी तालुक्यातील पुनगाव येथील मक्याच्या शेतात शॉर्टसर्किटमुळे भरदुपारी २ ते २.३० वाजेच्या सुमारास एका शेतकऱ्याने शेतात कापून ठेवलेला मका व बाजूच्या शेतातील दोन शेतकऱ्यांचा उभा असलेला मका अशा एकूण तीन शेतकऱ्यांच्या शेतातील ठिबक सिंचन, पाईपलाईनसह मक्याचा चारा व मक्याची कणसे जळून खाक झाली आहेत. या आगीमुळे शेतकऱ्यांचे सहा ते साडेसहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. पुनगाव येथील शेतकरी बिरणसिंग बाबुसिंग परदेशी, छायाबाई राजूसिंग परदेशी, प्रविणसिंग बाबुसिंग परदेशी ह्या शेतकऱ्यांच्या शेतात उन्हाळी हंगामात मक्याची लागवड केली होती. तीन ही शेतकऱ्यांचा मका काढणीवर आला होता. एका शेतकऱ्याचा मका कापून खुडून पडलेला होता. तर शेजारील दोन शेतकऱ्यांचा मका देखील काढणीवर आला होता. तो उभ्या स्थितीत होता. बिरणसिंग बाबुसिंग परदेशी यांच्या शेतातून



गेलेल्या वीज तारांच्या शॉटसर्किट झाल्यामुळे मक्याच्या शेतात आग लागली. क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि बाजूच्या शेतातील मका पीके देखील जळून खाक झाली आहेत. पुनगाव येथील शेतकरी बिरणसिंग बाबुसिंग परदेशी यांचे सह दोन शेतकरी यांच्या चार हेक्टर तीन आर खाकी दे यांचे ९० आर, छायाबाई परदेशी यांचे ६७ आर क्षेत्रात तर प्रविणसिंग परदेशी यांचे ८५ आर क्षेत्रातील मका, चारा, ठिबक सिंचन पाईप लाईन जळून खाक झाले. पाचोरा येथून अग्निशमन बंब येईपर्यंत बऱ्याच प्रमाणात मका जळाला होता.

अग्निशमन बंबाच्या सहायाने व शेतकऱ्याने कापलेल्या मक्याच्या शेतात व उभ्या मक्याच्या शेतात तात्काळ ट्रॅक्टरच्या सहाय्याने नागरटी केल्याने आग आटोक्यात आली होती. या आगीमुळे तीन्ही शेतकऱ्यांचे मिळून जवळपास सात लाखांचे नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे. पुनगाव येथील ग्राममहसुल अधिकारी तेजस भराटे, पोलीस पाटील प्रविण ठाकुर, कोतवाल चाळू मालचे यांनी केला आहे. पंचनामा केला आहे. तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांना शॉटसर्कीटमुळे मक्याच्या शेतात आग लागली असल्याचे कळविण्यात आल्यानंतर लगेचच महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन शेताची व वीज तारांची पाहणी केली. हातातोंडाशी आलेला घास महावितरणच्या हलगर्जीपणाने वाया गेला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेताला लागून असलेल्या बांधावरुनच ११ केव्ही लाईट गेली आहे, बांधावर मोठ्या प्रमाणात झाडी असुन विजेच्या तारा फांद्या मधून गेल्या आहेत त्यामुळे नेहमीच या ठिकाणी शॉटसर्कीट होत असतात परंतु महावितरणच्या हलगर्जीपणामुळे आज देखील शॉटसर्कीट झाल्यामुळे मक्याच्या शेतात आग लागली होती असे शेतकऱ्यांनी सांगितले.

## हिंगोणा येथे महाराजस्व समाधान शिबिराला प्रतिसाद

प्रतिनिधी । यावल

**तालुक्यातील हिंगोणा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन दि. १५ रोजी करण्यात आले होते. सदर शिबिर हे रावेर विधानसभा मतदारसंघाचे आ. अमोल जावळे यांचे सूचनेनुसार व मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते.**




परंतु काही अपरिहार्य कारणास्तव आ. जावळे येऊ न शकल्याने फैजपूर येथील उपविभागीय अधिकारी बबनराव काकडे यांचे अध्यक्षतेखाली हिंगोणा येथील पशुवैद्यकीय दवाखाना येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपन्न झाले. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्रांताधिकारी यांनी महाराष्ट्र शासनातर्फे सामान्य जनता आणि शेतकऱ्यांसाठी सरकार आणि सरकारी प्रतिनिधी कसे कार्यरत असून आपण कोणकोणत्या सुविधा व योजना उपलब्ध करून दिलेले आहे. याविषयी माहिती दिली. तर यावल तालुक्याच्या तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांनी महाराजस्व शिबिर हे ग्रामीण जनतेसाठी कसे महत्त्वाचे आहे व जनतेने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान त्याचा कसा फायदा करून घ्यायला पाहिजे हे अतिशय सोप्या पद्धतीने पटवून दिले. विशेष म्हणजे महिलांनी त्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचे लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले. या शिबिरामध्ये भालोद, हिंगोणा, डोंगरकठोरा, सांगवी, अट्रावल, चितोडा, बोरखेडा बुद्रुक, या गावांचा समावेश करण्यात आला होता. या शिबिरामध्ये शासकीय योजना लाभार्थींना सर्टिफिकेट, आयुष्यमान गोल्ड कार्ड व घरकुल योजना लाभार्थी, मिनी ट्रॅक्टर वाटप व पशुवैद्यकीय विभागातर्फे मका वाटप करण्यात आले.

## एरंडोल मतदारसंघात शिवसेनेचा मेळावा; मतदार यादी शुद्धीकरणावर भर

प्रतिनिधी । पारोळा

**आगामी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ एसआयआर आणि मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी बीएलए नेमणुकीच्या पार्श्वभूमीवर एरंडोल विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचा महत्त्वपूर्ण मेळावा पारोळा येथील विजया लॉन्स येथे उत्साहात पार पडला.**




आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी अभिवादन करत श्रद्धांजली अर्पण केली. मेळाव्यात पारोळा नगरपरिषदेचे नगरसेवक तसेच पंचक्रोशीतील अनेक पदाधिकारी व मान्यवरांनी आमदार अमोल पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे आमदार पाटील यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आला. या बैठकीत आमदार अमोल पाटील, नोबेल फाउंडेशनचे अध्यक्ष जयदीप पाटील तसेच नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी बी.एल.ए. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक घरापर्यंत पोहोचून मतदारांची अचूक माहिती तपासा, नव्या पात्र मतदारांची नोंदणी करा आणि बोगस व अपात्र नावे वगळण्यावर विशेष लक्ष द्या, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी एकही पात्र मतदार वंचित राहू नये, यावर विशेष भर देण्यात आला. बी.एल.ए. आणि बी.एल.ओ. यांच्यात समन्वय ठेवणे अत्यावश्यक असल्याचे सांगण्यात आले.

सरकारी यंत्रणा व कार्यकर्ते यांच्यात प्रभावी संवाद साधल्यास मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक व सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या मेळाव्यामुळे आगामी निवडणुकांच्या तयारीला गती मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले.

## जागतिक केळी दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । भुसावळ

न्हावी येथे जागतिक केळी दिनानिमित्त जे. टी. महाजन फ्रूटसेल सोसायटीत केळीच्या घडाचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली होती.

या प्रसंगी सोसायटीचे चेअरमन शरद महाजन यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमास व्हाईस चेअरमन भोजराज बोरोले, संचालक किशोर वाघुळदे, महेंद्र पाटील, सुजय महाजन, राजेंद्र भारंबे तसेच सोसायटीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून केळी या पिकाचे आर्थिक व कृषी महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपस्थितांनी केळी उत्पादन वाढीसाठी तसेच शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात केळी दिन साजरा करण्यात आला.

## शेतकऱ्याची सतर्कता तर वनाधिकाऱ्यांच्या तत्परतेने कोल्ह्याच्या पिलाचा वाचला जीव

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अनेरपासून जवळच असलेले वेळोदे येथील प्रगतिशील शेतकरी एकनाथ चुनीलाल भोई यांचे वेळोदे शिवारात असलेले शेतात दोन दिवसापासून कोल्हा जातीचे लहानसे पिल्लू आढळून येत असल्याने त्यांनी वनविभागाला दूरध्वनीच्या साह्याने संपर्क साधून सर्व माहिती दिल्यामुळे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आरएफओ बी.के. थोरात यांनी तात्काळ आपली टीम घेऊन घटनास्थळी दाखल झाले.**



शेतात पाहणी केल्यानंतर कोणीतरी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने कोल्हा जातीचे पिल्लूचे कंबरडे मोडल्याचे आढळून आल्याने त्या पिल्लाला वनविभागाच्या पिंजऱ्याच्या साह्याने चोपडा येथील पशुवैद्यकीय दवाखाना येथे उपचारासाठी वनविभागातर्फे आणण्यात आले. वेळीच उपचार झाल्याने पिलास जीवदान मिळाले. यावेळी घटनास्थळी वनरक्षक शुभम पाटील, राहुल पाटील, वनसेवक रोहित चौधरी, वाहन चालक मनोज मोरे व शेतकरी एकनाथ भोई यांनी परिश्रम घेतले.

**आम्ही शेतात जाऊन पाहणी केली असता. कंबर मोडल्यामुळे उचलून चोपडा येथे पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन गेलो. असता त्याच्यावरती प्रथमोपचार करून गोळ्या औषधी दिल्या व व्यवस्थित खाऊ पिऊ घातल्यामुळे त्याच्या तब्येतीत सुधारणा होताना दिसून येत आहे. असे सांगून शेतकरी एकनाथ भोई यांचे सुद्धा आभार मानतो.**

**– बी. के.थोरात, आर.एफ.ओ.**

## पत्रकार महेश गायकवाड यांना 'बाबासाहेब आंबेडकर नॅशनल अवॉर्ड २०२६' प्रदान

प्रतिनिधी । चोपडा



अडावद येथील रहिवासी पत्रकार महेश गायकवाड यांना नागपूरच्या एकता फाऊंडेशन,या सामाजिक संघटनेतर्फे दिला जाणारा मानाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना हा गौरव व सर्टिफिकेट ऑफ ऑनर देऊन सन्मानित करण्यात आले. संविधानाचा प्रचार आणि सामाजिक योगदान एकता फाऊंडेशनतर्फे राबवण्यात येणाऱ्या 'हर घर संविधान, घर घर संविधान' या मोहिमेत महेश गायकवाड यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

## चोपडा महाविद्यालयात आयबीपीएसपीओ परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

### पदव्युत्तर वाणिज्य विभाग; संशोधन केंद्रातर्फे करण्यात आला गौरव

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी पाटील महाविद्यालय चोपडा, पदव्युत्तर वाणिज्य विभाग व संशोधन केंद्रातर्फे आयबीपीएसपीओ परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.**



आयबीपीएस पीओ परीक्षा उत्तीर्ण महाविद्यालयातील बीकॉमचा माजी विद्यार्थी पवन जगन्नाथ मराठे याने The Institute of Banking Personnel Selection Probationary Officer (PO) परीक्षा उत्तीर्ण करून बँक ऑफ बरोडा मध्ये क्लास वन ऑफिसर ची नोकरी मिळविली त्यामुळे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, सचिव डॉ. स्मिता पाटील यांनी पवन जगन्नाथ मराठे याचे कौतुक करत सत्कार केला.

तसेच बीकॉमचा दुसरा माजी विद्यार्थी दिगंबर महाजन यांनी देखील पोलीस दलामध्ये नियुक्ती मिळवली. त्याबद्दल त्यांचेही स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या एम सोनवणे , महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी. ए. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे, उप प्राचार्य डॉ. ए. बी. सूर्यवंशी,समन्वयक डॉ. एस .ए. वाघ, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सी. आर. देवरे, सहा प्रा. पी. आय. जैन, तसेच विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते व प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की अतिशय गरीब परिस्थितीतून पुढे आलेला हा विद्यार्थी व त्याने आपल्या गरिबीवर मात करत तसेच संपूर्ण कुटुंबाची धुरा सांभाळत अतिशय चांगली अशी परीक्षा उत्तीर्ण केली व क्लास वन ऑफिसरची नोकरी मिळवली ही संस्थेसाठी, महाविद्यालयासाठी व विभागासाठी अभिमानाची गोष्ट आहे. असेच विद्यार्थ्यांनी उत्तरोत्तर प्रगती करावी अशा शुभेच्छा त्यांनी या प्रसंगी दिल्या.

## नगरसेवक सुनील चौधरी यांची कार्यतत्परता; तुडुंब भरलेली गटार झाली साफ

प्रतिनिधी । धरणगाव

शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील भावेगल्ली तसेच शास्त्री पुतळ्यामागील मशीद परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून गटार तुंबण्याची समस्या निर्माण झाली होती. गटारामध्ये साचलेला कचरा, गाळ व दूषित पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली होती. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. या समस्येमुळे त्रस्त झालेल्या रहिवाशांनी प्रभागाचे नगरसेवक सुनील चौधरी यांच्याशी संपर्क साधून आपली व्यथा मांडली. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत सुनील चौधरी यांनी कोणताही विलंब न करता



तात्काळ घटनास्थळी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. परिस्थितीची माहिती घेत त्यांनी संबंधित विभागाला त्वरित कारवाईचे आदेश दिले. नगरसेवकांच्या सूचनेनुसार सफाई कामगारांनी तत्काळ कामाला सुरुवात केली. गटारीतील तब्बल दोन ते अडीच फूट खोल साचलेला गाळ, कचरा आणि घाण बाहेर काढण्यात आली. या साफसफाईदरम्यान सुमारे तीन ट्रॅक्टर कचरा हटवण्यात आला. या स्वच्छता मोहिमेमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली समस्या अखेर मार्गी लागली. या कारवाईनंतर परिसरातील दुर्गंधी मोठ्याप्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिकांनी नगरसेवक सुनील चौधरी यांच्या तत्परतेचे आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचे कौतुक केले.